**पोलीस उप आयुक्त, कार्यालय**
**गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड.**
प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे.

**प्रेसनोट दिनांक /०९/२०२४**

## मालमत्ता गुन्हे विरोधी पथकाकडुन सराईत गुन्हेगारास अटक करून, चैन चोरीचे ०५ गुन्हे उघडकीस आणुन, ४,३०,०००/- रु. चा मुद्देमाल हस्तगत.

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयात चैन चोरीच्या घटना दाखल होत्या. त्याबाबत मा.पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड यांनी गुन्हे शाखेकडील पथक व युनिट यांना चैन चोरी गुन्हयांचा संमातर तपास करुन गुन्हे उघडकीस आणणे बाबत सुचना करण्यात आले होते. त्या अनुषंगाने श्री. संदीप डोईफोडे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, पिंपरी चिंचवड व श्री. डॉ. विशाल हिरे, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे १, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली मालमत्ता गुन्हे विरोधी पथकचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री विजय ढमाळ, यांनी अधिकारी व अंमलदार यांना पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील चैन चोरीच्या घटनास्थळी भेटी देवुन, अनेक सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करुन, रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक करुन गुन्हे उघडकीस आणणे बाबत मार्गदर्शन केले. त्या प्रमाणे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी घटना घडलेल्या परीसरातील असंख्य सीसीटीव्ही फुटेज चेक केले असता, रेकॉर्डवरील आरोपी **अनिरथ ऊर्फ अनिरूध्द योगेश नानावत** याचा चेन स्नॅचिंग गुन्हयात सहभाग असल्याची खात्रलायक बातमी मिळाल्याने, आरोपी **अनिरथ ऊर्फ अनिरूध्द योगेश नानावत,** वय २२ वर्षे, रा. कुसेगाव, ता. दौंड, जि. पुणे यास ताब्यात घेवुन, **पिंपरी पोलीस स्टेशन गुरनं ७१६/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३०९(६), ३(५)** या गुन्हयात अटक करून, आरोपीचे सीसीटीव्ही फुटेज पाहुन त्याचेकडे कौशल्यपुर्वक तपास करून, बारकाईने विचारपुस केली असता त्याने त्याचे इतर दोन पाहिजे आरोपी यांचेसह मिळुन पिंपरी, चिंचवड, चिखली व निगडी परीसरात चैन चोरी केल्याचे आढळुन आले. त्याचेकडे चौकशी करता त्यांनी पुढील गुन्हे केल्याचे कबुल केले.

१) पिंपरी पोलीस स्टेशन गुरनं ७१६/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३०९(६), ३(५)
२) निगडी पोलीस स्टेशन गुरनं ३४६/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३०९(४), ३(५)
३) चिंचवड पोलीस स्टेशन गुरनं ३१४/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३०९(४), ३(५)
४) चिखली पोलीस स्टेशन गुरनं ४४२/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३०९(४), ३(५)
५) चिखली पोलीस स्टेशन गुरनं ४७७/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३०९(४), ३(५)

वरील गुन्हयातील चोरीस गेलेला एकुण ०४,३०,०००/- रु चे सोन्याचे दागिने व एक मोटार सायकल असा मुद्देमाल आरोपी कडुन हस्तगत करण्यात आला आहे. नमुद आरोपी हा सध्या पोलीस कोठडीत असुन, अधिक तपास मालमत्ता विरोधी पथकाचे सहा पोलीस निरीक्षक, अभिनय पवार हे करीत आहेत. आरोपी हा सराईत गुन्हेगार असुन त्याचे वर पुढील प्रमाणे गुन्हे दाखल असल्याचे आढळुन आले आहे.

१. पालघर पोलीस स्टेशन गुरनं १५१/२०२२ भादवि कलम ३९५,३९७, महा पोलीस अधि कलम ३७(१)(३) सह १३५
२. लोणी काळभोर पोलीस स्टेशन गुरनं २५५/२०२४ भादवि कलम ४५४, ४५७, ३८०
३. लोणी काळभोर पोलीस स्टेशन गुरनं २७५/२०२४ भादवि कलम ४५७, ३८०

४. लोणी काळभोर पोलीस स्टेशन गुरनं ३८८/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३३१ (३), (२), (४), ३०५

सदर उल्लेखनीय कामगिरी ही मा. पोलीस आयुक्त श्री. विनयकुमार चौबे साो. पिंपरी चिंचवड, मा. पोलीस सह आयुक्त श्री. शशिकांत महावरकर, मा. श्री. वसंत परदेशी साो, अपर पोलीस आयुक्त, मा. संदीप डोईफोडे पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, मा. श्री डॉ. विशाल हिरे, सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे १, यांच्या मार्गदर्शनाखाली मालमत्ता गुन्हे विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय ढमाळ, सहा पोलीस निरीक्षक अभिनय पवार, पोलीस उप निरीक्षक भरत गोसावी, पोलीस अंमलदार महेश खांडे, औदुंबर रोंगे, विक्रांत गायकवाड, गणेश हिंगे, आशिष बनकर, राहूल खारगे, प्रविण कांबळे, नितीन लोखंडे, विशाल गायकवाड, सोमनाथ मोरे, नितीन उम्रजकर, प्रशांत पाटील, गणेश कोकणे, गणेश सावंत, विनोद वीर, सुमीत देवकर, चंद्रकांत गडदे, बाबाराजे मुंडे, हर्षल कदम व अमर कदम यांनी केली आहे.

**(संदीप डोईफोडे)**
पोलीस उप आयुक्त (गुन्हे)
पिंपरी चिंचवड